भोसरी पोलीस स्टेशन पिंपरी चिंचवड **आयुक्तालय**
**पत्ता:- पुणे नाशिक हायवे, सी. आय. आर. टी. जवळ, एमआयडीसी**
**भोसरी, पुणे.२६ फोन नं. ०२०- २७१२४७२८**
**ई--मेल आयडी** psbhosari.pcpc-mh@gov.in

**प्रेसनोट दिनांक १९/०५/२०२३**

# † सोशल मिडायावर स्टेटस द्वारे महिती घेवुन कोयता बाळगणऱ्यास भोसरी पोलीसांकडुन अटक †

मा. पोलीस आयुक्त श्री. विनय कुमार चौबे सो. यांचे आदेशानुसार भोसरी पोलीस स्टेशन सोशल मिडीया सेल स्थापन करण्यात आला असुन त्यावरून गुन्हेगारांचे सोशल मिडीया अकाउंटची पाहणी करीत असताना भोसरी पोलीस ठाणे अभिलेखावरील गुन्हेगारांनी पुर्व वैमनस्यातुन इंन्स्टाग्राम स्टेटसच्या माध्यमातुन विरोधी गटातील गुन्हेगारांना शिवीगाळ व खुन्नस देणारे संदेश पाठविल्याचे दिसुन आले. त्याबाबत अधिक चौकशी केली असता स्टेटस ठेवणाऱ्यांच्या इंन्स्टाग्राम ग्रुपमधील काही सदस्य रेकॉर्डवरील गुन्हेगार असल्याचे निष्पन्न झाले. दोन्ही गटांची गुन्हेगारी पार्श्वभुमी पाहता त्यांचे हातुन एखादा गंभीर स्वरूपाचा गुन्हा घडण्याची शक्यता असल्याने भोसरी पोलीस स्टेशन तपास पथकाचे अधिकारी व अंमलदारांनी सदस्यांची तपासणी सुरू केली. तपासणी दरम्यान आरोपी नामे शफिक सुलतान शेख, वय-२३ वर्षे, धंदा-वेल्डींगकाम, रा. गोडावुन चौक, भोसरी फिरस्ता मुळ पत्ता:- गाव चाकोर इंद्रानगर, ता. चाकोर, जि. लातुर यास काल दिनांक १८/०५/२०२३ रोजी रात्री ०९/०० वा. चे सुमारास मोहननगर भोसरी येथे ताब्यात घेतले त्याचे कब्जात एक धारदार लोखंडी कोयता मिळुन आल्याने त्याचे विरुध्द भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपासादरम्यान त्याचे गटातील सदस्यांचे सद्गुरूनगर भोसरी येथील गुन्हेगारांशी वाद झाल्याने त्या वादाचा बदला घेण्यासाठी त्याने सदरचा कोयता बाळगल्याचे तपासात निष्पन्न झाले. सदर आरोपीचे साथीदारांविरुध्द भोसरी एमआयडीसी पोलीस स्टेशन व पिंपरी पोलीस ठाण्यात गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असुन भोसरी पोलीस अधिक तपास करीत आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री. विनय कुमार चौबे, मा. पोलीस सह. आयुक्त श्री. डॉ. संजय शिंदे, मा. अप्पर पोलीस आयुक्त श्री वसंत परदेशी, मा. पोलीस उपायुक्त परिमंडळ – १ श्री. विवेक पाटील, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, पिंपरी विभाग श्रीमती प्रेरणा कट्टे सो., वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. भास्कर जाधव, यांच्या प्रत्यक्ष मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरिक्षक, कल्याण घाडगे, पोलीस उप-निरीक्षक मुकेश मोहारे, तसेच सहा. पोलीस फौजदार राकेश बोयणे, पोलीस अंमलदार सचिन गारडे, नवनाथ पोटे, धोंडीराम केंद्रे, सागर जाधव, तुषार वराडे, आशिष गोपी, प्रतिभा मुळे, संतोष महाडीक, स्वामी नरवडे, अनिकेत पाटोळे, ज्ञानेश्वर साळवे यांनी सदरची उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

**(विवेक पाटील )**
**पोलीस उप-आयुक्त**
**परिमंडळ - १, पिंपरी चिंचवड.**